ISSN : 2348-7143
Oct-Nov-Dec 2017

# बंजारा साहित्यातील 'स्त्री' चित्रण

**प्रा. व्ही. बी. राठोड**
**कर्मवीर आबासाहेब तथा ना.म.सोनवणे -**
**कला, वाणिज्य व विज्ञान महाविदयालय, सटाणा**
**ता. बागलाण जि. नाशिक**
**मो.न.: ९१७५६९०४८९**
**ई - मेल : rathodvishnubhaurao@gmail.com**

अलिकडच्या काळात साहित्यामध्ये विविध विचारसरणीच्या अंगाने लेखन होतांना दिसत आहे.मराठी साहित्य सुध्दा यास अपवाद नाही. मराठी साहित्याचा विचार करता मराठीच्या सर्वच प्रकारांमध्ये वैविध्यपूर्ण विषय हाताळले जातांना दिसत आहे. अभिजातवाद, सौंदर्यवाद, वास्तववाद, अतिवास्तववाद, अस्तित्ववाद, मार्क्सवाद, गांधीवाद, देशीवाद अशा अनेक विचारसरणीच्या अनुशंगाने मराठी साहित्य लिहिले जात आहे. अशाच अनेक विचारसरणीतील प्रभावी विचारसरणी 'स्त्री' च्या अनुशंगाने आहे. स्त्रियांच्या संदर्भात आपल्याकडे नेहमी बदलती विचारसरणी राहिलेली आहे. स्त्रियांकडे पाहण्याचा पुरुषांचा बदलता दृष्टिकोन किंवा स्त्रियांनी आपल्या प्रश्नांना स्वत: फोडलेली वाचा असो यातून स्त्रीवाद जन्माला आला. आधुनिक मराठी साहित्याचा इतिहास पाहता असे दिसून येते की, सुरवातीला 'स्त्री' विश्वाचे चित्रण पुरुषांनीच केलेले आहे. पुरुषांना स्त्रियांच्या सर्वच प्रश्नाचे आकलन त्यातून मांडता आले नाही. याचे कारण मला जखम झाली त्याची वेदना जितकी मला होईल तितकी वेदना पाहणाऱ्यांना होणार नाही. स्त्रियांवर रुढी परंपरेच्या नावाखाली पुरुषांकडून होणारे अत्याचार काही समाजसुधारकांनी मांडण्याचा प्रयत्न केला पण तो परिपूर्ण होता असे म्हणता येणार नाही. बाबा पदमनजी यांनी विधवा विवाहावर आधारित यमुना पर्यटन कांदबरी लिहिली पण यावर समीक्षकांना शंका अशी वाटते की लेखकाने यातून ख्रिश्चन धर्माची अप्रत्यक्ष महती विशद करावयाची होती. असो पण स्त्रियांच्या सर्वच प्रश्नांवर प्रकाश आपल्या साहित्यातून टाकला जात नव्हता. जेव्हा विभावरी शिरुरकरांनी आपल्या हिंदोळयावर , शबरी, कळयांचे निस्वा:स अशा कादंबरीतून, तसेच अंतकरणाचे रत्नदिप सारख्या कथेतून स्त्रियांच्या मनोवस्थेचे जे चित्रण केले त्यातून खऱ्या अर्थाने स्त्रियांच्या जीवनावर प्रकाश पडू लागला.

स्वातत्र्योत्तर कालखंडात शिक्षण खेडयापाडयात पोहचल्यामुळे आणि स्त्री ही स्वत: शिकल्यामुळे आपल्या भावना संवेदना शब्दाच्या माध्यमातून व्यक्त करते आहे. यातून स्त्रीवादी विचारसरणी अस्तिवाद आली. जो स्त्री वाद पाश्चात्य देशात सोळाव्या शतकात जन्माला आला. ही विचारसरणी आपल्याकडे येण्यास एकविसावे शतक उजाडावे लागले. समाजातील अतिशय महत्वाचा घटक, पन्नास टक्के वर्ग अविकसित असल्याकारणानेच आपल्या देशाचा विकास हा पाश्चात्यांप्रमाणे न होता अविकसित राहिला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मनुस्मृतीची होळी करण्यामागचे कारण हे होते. माणसारख्या माणसाला माणूस न समजणारा मनुस्मृती ग्रंथ स्त्रियांच्या बाबतीत 'न स्त्री स्वातंत्रम् अर्हति' असे म्हणतो. आपल्या समाजात जातीनुसार वर्ग होतेच. शिवाय प्रत्येकाला शिक्षणाचा अधिकार तर नव्हताच पण स्त्रियांच्या बाबतीत विचार करता असे म्हणावे लागेल की दलितातील दलित. कारण दलितांची व्याख्याच मुळात वर्षोनुवर्ष ज्यांच्यावर अन्याय अत्याचार झाला, जे इतर वर्गाच्या अतित होते ते दलित. भारतातील स्त्रियांचा विचार करता आपल्याला राजकीय स्वातंत्र इ.स.१९४७ साली मिळाले. स्त्रियांना आपण मतदानाचा अधिकारही दिला. पण स्त्रिला खऱ्या अर्थाने आपल्या देशात, समाजात स्वातंत्र्य मिळाले आहे का ? या प्रश्नावर उत्तर देतांना मनात कुठेतरी शंकेची पाल चुकचुकते. अजुनही स्त्रियांच्या संदर्भातले अनेक निर्णय पुरुषच घेतांना दिसतात. शहरी भागाचा विचार करता थोडा आशावाद करायला हरकत नाही. पण तरीसुध्दा स्त्रियांकडे दुय्यमत्वाच्या

दृष्टिनेच पाहिले जाते. ग्रामीण भागात तर अतिशय भयावह स्थिती आहे. स्त्रियांना देवाच्या नावाने मुरळी म्हणून सोडणे असो, पहिले लग्न मोडले तर दुसरे लग्न करण्याची मुभा नसणे, गुप्त धन काढण्यासाठी मुलीचा बळी देणे, हुंडयाशिवाय लग्न न जमणे वा करणे, पुर्नविवाहास मान्यता नसणे, मुलीला परक्याचे धन समजणे अशी विचारसरणी स्वत:ला प्रतिष्ठीत समजणाऱ्या जाती जमातीतही पहावयास मिळते. बंजारा समाजाचा विचार करता साहित्याच्या माध्यमातून स्त्रियांच्या संदर्भात विचारसरणी कशी मांडली आहे? वस्तु:स्थिती तशी आहे का ? या दृष्टिकोनातून सदर शोधनिबंध मांडयाचा प्रयत्न आहे.

साहित्य हा समाजाचा आरसा आहे. समाजाचे प्रतिबिंब हे साहित्यामध्ये उमटत असते. बंजारा समाजाचे प्रतिबिंब उमटलेल्या साहित्यास आपणाला बंजारा साहित्य म्हणता येईल. बंजारा समाजाचे प्रतिबिंब उमटलेल्या साहित्याचे आपल्याला वर्गीकरण करावे लागेल . कारण काही अभ्यासकांनी बंजारा समाजात बोलल्या जाणाऱ्या बोलीचा आधार घेत त्याचा शास्त्रीय पध्दतीने अभ्यास करण्याचा प्रयत्न केला. तर काही अभ्यासकांनी या समाजातील लोकगीते, लोककथा, म्हणी, सुवासिते, वाक्प्रचार या घटकाच्या अनुशंगाने म्हणजे बंजारा लोकसाहित्याचा आधारे बंजारा समाजाच्या संस्कृतीवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला. उदा. - राजाराम राठोड गिळयानंद यांनी मराठवाडा विदयापीठात परभणी जिल्यातील बंजारा विधी व विधी गीतांचा लोकतत्वीय अभ्यास केला. राठोड भाऊ धनु यांनी अमरावती विदयापीठात मराठवाडयातील बंजारी लोकगीते व दंतकथा यांचा सामाजिक व वाङ्मयीन दृष्टया चिकित्सक अभ्यास केला. राठोड भिमराव श्रीराम यांनी अमरावती विदयापीठातून जालना जिल्हयातील बंजारा बोली भाषेतील लोकसाहित्याचा चिकित्सक अभ्यास केला. राठोड सुनिल आनंदराव यांनी अमरावती विदयापीठातून वैदर्भीय बंजारा बोलीतील गीते या विषयावर चिकित्सक अभ्यास केला. गणपतराव राठोड यांनी मराठवाडा विदयापीठातून हिंदी भाषेत बंजारा लोकगीतोंका सांस्कृतिक अध्ययन या विषयावर अभ्यास केलेला आहे.मोहन चव्हाण यांनी मराठवाडा विदयापीठातून बंजारा बोली भाषा : एक अध्ययन या विषयावर अभ्यास केलेला आहे. तसेच सुनंदा पाटील यांनी उत्तर महाराष्ट्र विदयापीठातून गोर बंजारा - लोकसंस्कृती व लोक वाङ्मय या विषयावर अभ्यास केला आहे. रोनाल्ड ली यांनी लमाणी फोनोलॉजी, ग्रामर अँड लेक्सिकॉन या विषयावर अभ्यास केला आहे. अनिल गर्जे लहानू यांनी पुणे विदयापीठातून लमाण बंजारा लोकजीवन आणि लोकसाहित्य या विषयावर अभ्यास केला. अरुण जाधव यांनी बंजारा लोकसाहित्याचे स्वरुप आणि प्रेरणा या विषयावर अभ्यास केलेला आहे. याशिवाय बंजारा समाज व संस्कृतीवर अभ्यासपूर्ण ग्रंथाचे प्रकाशन काही अभ्यासकांनी केलेले आहे. त्यात प्रा. मोतीराज राठोड यांनी गोरमाटी, गोर बंजारा समाजाचा इतिहास, बंजारा संस्कृती, तांडा संस्कृती . श्री बळीराम पटेल यांनी गोर बंजारे लोकांचा इतिहास, डॉ. यशवंत जाधव यांनी बंजारा जाती, समाज और संस्कृती, डॉ. श्रीराम शर्मा यांनी बंजारा समाज , भाई प्रेमसिंग जाधव यांनी बंजारा दर्पण , डॉ. केशव फाळके यांनी बंजारा लोकसाहित्य, डॉ. श्रीराम पवार यांनी पारंपरिक गोर बंजारा स्त्री, आत्माराम कनिराम राठोड यांनी तांडा, पंजाब चव्हाण यांनी बंजारा समाज दर्शन प्राचार्य मधुकर पवार यांनी एका तांडयाची यशोगाथा असे ग्रंथ प्रकाशित झालेले आहेत.

स्वांतत्र्योत्तर कालखंडामध्ये खेडयापाडयापर्यंत शिक्षण पोहचल्यामुळे ग्रामीण भागातील शिक्षित आपल्या समस्या, भावना विचार शब्दाच्या माध्यमातून व्यक्त करु लागला. बंजारा समाजाचा विचार करता असे दिसून येते की, व्यापरी असणाऱ्या या जमातीला इंग्रजांनी गुन्हेगार ठरवून तारेच्या कुंपणात बंदिस्त ठेवले. हेतू हाच होता की स्थानिक राजे रजवाडे यांना अन्नधान्यांपासून हत्यारापर्यंत रसद पोहचविणाऱ्या घटकांना पायबंद घालावा. पण या कुंपणातून व गुन्हेगारीच्या आरोपातून मुक्त होण्यास बंजारा समाजाला स्वातंत्र्यानंतर एका दशकाची वाट पहावी लागली. तरीसुध्दा बंजारा समाजातील व्यक्ती आपल्या संवेदना शब्दाच्या माध्यमातून मांडण्याचा आणि तांडा संस्कृतीचे दर्शन घडविण्याचा सातत्याने प्रयत्न करतांना दिसतो. गेल्या दोन तीन दशकात अतिशय दर्जेदार म्हणता येणार नाही परतुं साहित्याच्या सर्व प्रकारातून लेखन होतांना दिसत आहे. सर्वात जास्त लेखन 'काव्य' या प्रकारात झालेले आहे. त्यात

आत्माराम कनिराम राठोड लिखित 'आत्माराम कनिराम राठोड यांच्या कविता', जवाहर राठोड लिखित 'डोंगराचे ढोल', रावजी राठोड लिखित 'मलाण', मोहन नाईक लिखित 'केसूला', मांगीलाल राठोड लिखित 'निळतळीचे पळसबन', उत्तम राठोड लिखित 'व्यासपीठ', राजाराम जाधव लिखित 'वादळवारा', प्रेमदास राठोड लिखित गराशा,रानवा, व बंब रामकुमार चव्हाण लिखित काटेरी पुष्प राजाराम राठोड लिखित आर्त, किसन पवार लिखित रानपाखरं, प्रमिला राठोड लिखित नवे अंकुर, शशिकला चव्हाण लिखित बंधमुक्ता, हरिश्चंद्र राठोड लिखित उध्वस्त, नथ्थू चव्हाण लिखित लेंगीनायक, डॉ.रमेश जाधव लिखित गोरकविता, रतन आडे लिखित आथारी, अरुधंती नाईक लिखित घुंगरवाळा आदी काव्यसंग्रह प्रकाशित झालेले आहेत. तसेच पंजाब चव्हाण, डॉ. रुक्मिणी पवार, ललिता राठोड, प्रमिला जाधव, ललिता राठोड अशी कितीतरी कवी आणि कवींनी आपल्या भावना काव्याच्या माध्यमातून मांडलेल्या आहे. काव्याबरोबर कथा - कादंबरीतूनही तांडा संस्कृतीचे दर्शन घडविण्याचा प्रयत्न नवोदित तांडयातील लेखकांनी प्रयत्न केलेला आहे. त्यात रावजी राठोड यांची 'गोठण', हरिश्चंद्र राठोड यांची 'संघर्ष', राजाराम जाधव यांची 'चंद्रकला' आदी कादंबऱ्या प्रकाशित झालेल्या आहेत. आत्माराम कनिराम राठोड यांचे धरतीचे धनी, नसाबनीती आणि हामार गोरुन बालबच्यार साकी आदी कथासंग्रह प्रकाशित आहेत. शरद राठोड यांचा सापळा, राजाराम जाधव यांचा वाळवंटातील संधीप्रकाश, प्रदीप राठोड यांचा साखळदंड, आणि हरिश्चंद्र राठोड यांचा उध्वस्त आदी कथासंग्रह प्रकाशित झालेले आहेत. बंजारा साहित्यिकांनी आत्मकथन या प्रकारातही लेखन करुन स्व- जीवनाबरोबर बंजारा समाजाचे चित्रण करण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. पंजाब चव्हाण यांचा याडी,शिवाजी राठोड यांचा टाबरो, प्राचार्य मधुकर पवार यांचा एका तांडयाची यशोगाथा, बळीराम पाटील यांचा आलेख समाज प्रगतीचा, आत्माराम कनिराम राठोड यांचा तांडा, रावजी राठोड यांचा तांडेल अशी सरस आत्मकथने प्रकाशित झालेली आहेत. बंजारा साहित्यिकांनी नाटक , ललित गदय आदी प्रकारातही लेखन केलेले आहे. वरील सर्व साहित्य बंजारा समजाच्या संस्क़तिवर प्रकाश टाकतांना दिसत आहे. या साहित्याचा अभ्यास करता असे लक्षात येते की बंजारा संस्कृती ही बहुआयाम असलेली, अनेक संस्कृतिच्या छटा आपल्यात सामावून घेणारी दिसते. भारतीय संस्कृतीमध्ये स्त्रिला देवतेचं स्थान दिलेले आहे. बंजारा संस्कृती ही सुध्दा भारतीय संस्कृतीचे अविभाज्य अंग असून बंजारा समाजामध्येही स्त्रिला आदराचे स्थान आहे.

बंजारा समाजातील स्त्रियांचे चित्रण हिंदी साहित्यात असो वा विविध कलेमध्ये असो आजही सुंदरतेशी जणू काही समीकरण असल्याचे दिसते. हिंदी चित्रपट सुष्टी असो वा मराठी त्यात अनेक नुत्यांमध्ये अभिनेत्रीला बंजारा स्त्रियांच्या वेशभूषेत सादर केले जाते. याचा अर्थच असा होतो की बंजारा स्त्रियामध्ये नैसर्गिक सुंदरता तर आहेच शिवाय ती निसर्गानुसार आचरण करत असल्याकारणाने तिच्या सुंदरतेत अधिकच भर पडली आहे. बंजारा समाजाच्या लोकसाहित्यात बंजारा स्त्रिच्या सुंदरतेची अशीच आख्यायिका लोकप्रिय आहे. ती अशी - राजस्थाने मांइये हाकडा नामेरी मोठी नंदी हेती . वत लाखा बंजारेरो तांडो हेतो. लाखा बंजारा तांडेरो नायक हेतो. वरी घरेवाळी घणी सुंदर हेती. वरी घरेवाळीरं रुपेरी वातं वतेरं आजूबाजूरं गामेनं फेलगी . यी वात वतेरी राजपूत राजार कानेमाई गी. राजपूत राजा हेतो मंडोर राजे रो. सरदारेरं ढांईती लाखा बणजारेरं घरेवाळीरं रुपेरी चर्चा खूप सामळरो थो. राजा वन मळेपुरता धडपड करे लागो. वरपुरता वुं वोरढांईरं सरी पुंजी देनं तयार हेगो. तांडेरं मांई लढाई लगायो. सारी वात करेर करनं बेठगो पण वोनं कांई लाखा बणजारारं घरेवाळी कांई मळी कोनी . सरते शेवटी कटाळणं राजा ताकदेरं वापर करेरं ठेरायो. आपणी सेनानं लढाई करताणीनं तांडेमाईरं सुंदरीन लायेरं हुकूम रे दिनो. वडती वडती वात लाखा बणजारेरं कानेमांई चलेगी . वरवडेती लाखा भी लढाईरं तयारी कर लिदो . वरपुरता तांडेरं लोकून एक किदो. नायक हेतो वोरमुळे तांडेर इज्जतेरं वात हेती. इज्जतेपुरता तांडो राजाती जी - जवानेती लढाई किदो. लढाई मांई राजारी हार हेगी. लाखा लढाई जितगो. राजा जखमी हेताळीनं लढाई मांईती धाटगो. राजा हेतो हालकट प्रवृत्तीरो . एक बाईनं लाखारी बाईनं फसलायेनं मेलो. पण कांईचं फायदो हेवो कोनी . एकदन तांडेमायेरी आदमी कामधंदे करेनं भार गेते. यी संधीरं

राजा फायदो वठायो. तांडेम जाताळीनं वोरं बाईनं बळजबरीती वठानं लेगो. लाखा बनजारा वर बाईनं ढुंडेकरता जीव तोडनं कोशीश किदो. पण वोरं पत्तो कांई मळेनी. लाखारं कानेमांई वडती वडती बातमी आयी की वर घरेवाळी मरगी. लारेती नीट मालम पडी की स्वत:री आणि तांडेरी लाज बचायेपुरता जेर खान मरगी. पण राजारं वस कांई ही कोनी. लाखानं खूप दु:ख हेवो. राजानं अद्दल घडायेरं मनेमांई ठेरायो. वरे राजेमांई हेकडा नामेरं नदीरं पाणी मळतो थो. वो नदीरं पाणीपर वोनुरं जगणो हेतो. वू नंदीरं पाणी वोनूंन न जाय देता दुसरी बाजून मोडेरो ठेरायो. तांडेर लोक मदतेनं हेतेचं. आपणेढांईर बळदेरं मदतेती मोठमोठे भाटा नाकनं वो नंदिरो मुंडो वळादिनो. वोरमुळे वो राजारे राजेमांई पाणी मळणू अवघड हेगो. राजारो लाखा हानु कोनी तो वर पध्दतीती बदला लिदो.

बंजारा समाजात स्त्रियांचे शिक्षणाचे प्रमाण अत्यल्प आहे. साहित्यचित्रणाच्या अंगाने विचार करता इतर समाजाच्या मानाने विमुक्त गणांच्या स्त्रिया हया सर्वच क्षेत्रात मागे राहिलेल्या आहेत . मात्र गेल्या दोन दशकात बंजारा स्त्रियांनीही साहित्यातून अभिव्यक्ती करायला सुरवात केलेली दिसते कवयिली प्रमिला राठोड यांनी आपल्या **'नवे अंकुर'** या काव्यसंग्रहातील कवितेतून बंजारा स्त्रिचे चित्र शब्दाच्या माध्यमातून रेखाटलेले आहे. उदा. 'खरं बोलणं कोणाला रुचत नाही ... ... खरं बोलू का? अशी विचारणा करुन स्त्रिला अबला समजणारा आपला समाज लहानपणी पित्याच्या अधिपत्याखाली, तरुणपणी पतीच्या अधिपत्याखाली, आणि म्हातारपणी मुलाच्या अधिपत्याखाली वावरण्यास भाग पाडतो. बाबा तिच्याकडे परक्याचे धन म्हणून पाहतात. पण स्त्री मायेच्या ममतेने भरलेली असते. ती मुलाच्या प्रेमात गुरुफटणारी, पतीच्या जाचाला कवटाळणारी, दिराच्या मस्करीला जाब देणारी ही स्त्रिच असते. सासू सासऱ्याची सून, प्रेम करणारी प्रेमिका, नातवंडाचे बोबडे बोल बोलणारी ही स्त्रिच असते. अशा अनेक नात्यांना गुंफणारी ती एक असते अमृतवेल ! ' शृंखला ' नावाच्या कवितेत कवियित्री प्रमिला राठोड यांनी स्त्री चे विविध रुप इतिहासाच्या पानावरुन घेऊन आपल्या शब्दाच्या द्वारा चितारण्याचा प्रयत्न केलेला आहे. शिवाजीला घडविणारी जिजाऊ ही स्त्रीच होती. बाळाला पाठीशी बांधून इंग्रजांशी निधडया छातीने लढणारी ही झाशीची राणी ही स्त्रीच होती. अपार कष्ट आणि यातना सहन करणारी सावित्रीबाई ही एक स्त्रीच होती. दानधर्म आणि नीतीमुल्ये जोपासणारी अहिल्याबाई होळकर ही सुध्दा स्त्रीच होती. राजकारणातील इंदिरा गांधी, भाबडया मनाने गीत गाणारी, अंतराळात भरारी घेणारी कल्पना चावला, समाजावर प्रेम करणारी मदर तेरेसा, अशा कितीतरी स्त्रियांनी आपला इतिहास सोनेरी अक्षरात आपल्या कर्तृत्वाने लिहला आहे. संस्कृतीच्या चौकटीला छेदणारी तिची कार्ये ही त्रिकालबाधित सत्य असून अशा स्त्रिचे रुप कवियित्री माझेच आहे. असे अभिमानाने सांगते. आणि आपल्या काव्यातून स्त्रीवादी विचार मांडते.

**'तांडा'** या आत्मकथनाच्या द्वारा आत्माराम राठोड यांनी स्वत:च्या चरित्राबरोबर सदय:स्थितील बंजारा समाजाचे, बंजारा समाजातील स्त्रियांचे चित्रणही केले आहे. चपली काकू मोहाची दारु पिते, लेखकाची आई ' या ' निरक्षर असून सहनशील आणि श्रध्दाळू स्त्री आहे. अबोल हुनकी डाकीण असून आपल्यावर बलात्कार करणाऱ्याला धडा शिकवू शकत नाही. गोमामाई तांडयाला देवाधर्माच्या नादी लावते. मात्र देवाधर्माच्या नावाखाली लुबाडत मात्र नाही. पुनम अत्यंत शालीन असूनही भोंदू भगताच्या नादी लागून पळून जाते. भानी साध्वी बनून काम मात्र सैतानासारखे करते. रती जातीपातीचे बंधन झुगारुन लेखकावर निस्सिम प्रेम करते. संसार मात्र स्वजातीय मुलाशीच करते. यशोदा वंशवेल बहरणार नाही या चिंतेने भर यौवनात एड्रीन पिवून जगाचा निरोप घेते. शांता कोणाचा तरी हात धरुन मुलाबाळासह नवऱ्याला कंगाल करुन निघून जाते. आणि नवरा मेला असे सगळीकडे ओरडत फिरते. या स्त्री पात्रावर बारकाईने लक्ष दिल्यास असे लक्षात येते की बंजारा स्त्री ही दारु सारखे व्यसन करते. म्हणजे होळी सारख्या सणाच्या वेळेस बंजारा स्त्री ही दारु पिते आणि नृत्य करते आणि समाज यास मान्यता देतो. तसेच अंधश्रध्दा आणि अशिक्षितपणा असल्यामुळे दारिद्रयात जीवन जगतांना दिसत आहे.

मोहन गणूजी राठोड ऊर्फ भिमणीपूत्र यांनी **'केसूला'** या काव्यसंग्रहात झलकरी देवी नावाची कविता लिहली आहे. झलकरी नावाची गोरगणातील राठोड कुळातील साहसी व पराक्रमी गोर स्त्री. झाशीच्या राणीप्रमाणे हिने इंग्रजाशी लढता लढता प्राणाची आहुती दिली. तिच्या पराक्रमाची गाथा गोरगण आपल्या लोकगीतातून आजही गात आहेत. झलकारीचे चित्रण करतांना कवी म्हणतात - " घाबरु नकोस झलकारी | तुझे बलिदान नाकारणार नाही कुणी| शोधतोय मी तुला इतिहासाच्या पानापानात | रानावनातील लोकजीवनाच्या लोकसाहित्यात | कुठे कुठे तू आढळत नाहीस | मात्र तांडयाच्या लोकसाहित्यात आहेस तू जिवंत | आजही तुझे ते शौर्य , डोळयातील आग, तुझी ती ललकारी | ........ तांडा अजुनही गात आहे. | भुकियारी छोरी झलकारी | फरेंगीयांन दलकारी | दलकारी छोरी भुकियारी | छोरी झलकारी " **'रानवा'** या काव्यसंग्रहात कवी प्रेमदास राठोड स्त्री वादी जाणीवेतून काव्य रेखाटतांना 'नाते' या कवितेमध्ये लिहितात...... " कुखु कपाळी लावता | भार नऊ हाती पडे | लेक भारानं वाकली | तिचे मायबाप रडे | ....... बाई घराचा आधार | बाई घराचा शृंगार | बाई घराचाच खांब | नव्हे, नव्हे बाई घराचा आरंभ |" या कवितेतून कवीने स्त्री ही स्वत:चे अस्तित्व टिकवून घराला घरपण देणारी , घर बनविणारी स्त्री चे चित्र जिवंत असे रेखाटले आहे.

रावजी राठोड यांनी ' गोठण' या कांदबरीतून बंजारा समाजातील स्त्रीचे दर्शन घडविण्याचा प्रयत्न केलेला आहे. या कादंबरीमध्ये मुख्य पात्र असलेल्या चंदन राठोड यांची आई ही उपजीविकेसाठी रानोमाळ भटकुन तेदूंची पाने तोडणारी नि मोळी विकणारी, सणावारालाही जीर्ण वस्त्रेच परिधान करणारी याडीचे अठराविश्व दारिद्रय मनाला स्पर्श करुन जाणारे आहे. जंगलात प्रसृत होणारी आणि नखाने नाळ तोडणारी पिरी, नवऱ्याचे निमुटपणे मार सोसणारी चंपी, वाग्याशी अनैतिक संबंध ठेवणारी फरेंगी, नवऱ्यालाही हिसका दाखविणारी फरेंगी म्हणते - " म्या तसं कायबी केल्यालय न्हायं, वाटवर थान लागली त पानी पिनं गुना व्हत न्हाई ! अन् उपाशी पोटी दिसं कसं ढकलायचं? मर्दाची जात म्हणू भूक लागली तं तुमी कुठंभी हादडायचं आन् हामी बाईजात सतीसायत्री व्हवून तुमची वाट बघत बसायचं. झाडाचं फळ खाल्ल तर चोरी व्हतीयं ? हामचं जगणं तर रानपखेरुगत हाय. भरल्या कणसावर पखेरु बसल्याबिगर ऱ्हात्यात ? गोफण घुमवल्यानबी उडता उडना इतं तर राखणचं नको, म्हणल्यानं कसं व्हायचं ? अंगाला हात लावायचं काम न्हायं. हिंमत असेल तर बसवा मळावं. व्हउंदे नसाब निवाडा काय व्हायचं ते व्हईल फसयला." अशी बंडखोर फंरेगी आपल्याला गोठणमध्ये पहावयास मिळते. नवरा सोडून भर यौवनात मर्दानकी करत फिरणारी, माणसाची सावली न पडू देताही पोटूशी राहणारी व अनौरस संततीला हाताने यमसदनाला धाडणारी क्रुर संगी, यौवनाने रसरसलेली रंगी अशी अनेक स्त्री व्यक्तिरेखा रावजी राठोड यांनी आपल्या गोठण मध्ये रेखाटलेल्या आहेत.

**सारांश -**

बंजारा समाजातील स्त्रियां या आदिम काळापासून स्वछंदी जीवन जगतात. सण उत्सवाच्या वेळी मदयप्रान करतात. नृत्य करतात. स्वत:चा पोशाख स्वत: तयार करतात. बंजारा स्त्रियांचा पोशाख जणू बंजारा समाजाची ओळखचं आहे. घागरा आणि डोक्यावर काठी केसांच्या रचनेत गुंफून त्यावर ओढणी, डोळयाच्या दोन्ही बाजूला चांदीचे लहान घुंगरांनी बनविलेली टोपली, हातातील कोपऱ्यापर्यंत हस्तीदंती बांगडया पायातील, गळयातील अलंकार या सगळयांनी बंजारा स्त्री ही एक स्त्रीयांना आदर्श आहे. दिराला देवर मानतात. देवर चा अर्थ दुसरा वर. पतीचे निधन झाले तर दिराशी लग्न करण्याची प्रथा आहे. माणसाला जसे पुर्नविवाह करण्याची सोय आहे. तशीच सोय बंजारा समाजात स्त्रियांनाही आहे. याला समाजाची मान्यता आहे. तसेच काही कुटुंबात स्त्री ही कुंटुंब प्रमुखही असते. लग्नात हुंडा पध्दत नाही. फार तय गाय दान देण्याची पध्दत होती. पण अलिकडे इतर समाजाचे अनुकरण करीत हुंडा पध्दत आलेली दिसते. मुलीला लग्न ठरवितांना स्वत:चा विचार मांडण्याची स्वतंत्रता असते. तांडयात न्याय पंचायत

स्वतंत्र असल्यामुळे आपल्यावर होणाऱ्या अन्यायासाठी न्याय केव्हाही मागतांना दिसते. म्हणजे बंजारा समाजातील स्त्रिया हया इतर समाजापेक्षा अशिक्षित असल्या तरी परंपरेला जपत स्वछंदी जीवन जगतांना दिसतात.

**संदर्भ** :


१. प्रेमदास राठोड , गराशा, सौ. सीमा राठोड प्रकाशक, परभणी, प्र.आ. २००३.
२. डॉ. रमेश जाधव , विमुक्तरंग , गोरवाणी प्रकाशन , औरंगाबाद,
३. रावजी राठोड , गोठण, शब्दालय प्रकाशन , श्रीरामपूर , औरंगाबाद,२००७.
४. भिमणीपूत्र नाईक, केसूला, श्रावस्ती प्रकाशन, यवतमाळ, २००२.
५. आत्माराम कनिराम राठोड, तांडा, १९८९.
६. प्रमिला राठोड, नवे अंकुर, २००४.